## जिल्हाधिकारी लातूर यांचे कार्यालय

(जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण)

---

**वाचा:** १. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५

२. मा. मुख्यमंत्री महोदय, यांच्या दि. १२.०३.२०२० रोजीच्या व्ही. सी. मधील सुचना

३. मा. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय मुंबई यांचे पत्र क्र.करोना-२०२०/प्र.क्र.५८/आरोग्य-५ दि.१४.०३.२०२०

४. अधिसूचना सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय मुंबई दिनांक १४.०३.२०२०

५. साथरोग प्रतिबंधात्मक कायदा, १८९७

६. महाराष्ट्र शासन क्र.करोना-२०२०/प्र.क्र.५८/आरोग्य-५ दि.१४.०३.२०२०

७. या कार्यालयाचे आदेश क्र. २०२०/आव्य/कावि-८८ दि. १५.०३.२०२०

---

क्र.२०२०/आ.व्य./कावि-९४ दिनाक:-१८.०३.२०२०

**आदेश :-**

ज्याअर्थी संदर्भीय शासन पत्रकान्वये शासनाने करोना विषाणूचा (कोव्हीड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा, १८९७ दिनांक १३.०३.२०२० पासून लागू करून खंड २, ३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे. याबाबतची नियमावलीही तयार करण्यात आली असून स्वतंत्ररीत्या निर्गमित करण्यात आली आहे.

ज्याअर्थी, संदर्भीय क्र. ७ अन्वये करोना विषाणूचा होणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून जिल्हयातील सर्व शासकीय व खाजगी शाळा तसेच महाविद्यालय, अंगणवाडया व व्यवसाय प्रशिक्षण केंद्रे, खाजगी शिकवणी वर्ग इत्यादी दि. ३१.०३.२०२० पर्यंत बंद ठेवणेबाबत आदेशित केले आहे.

त्याअर्थी, मी, जी. श्रीकांत, जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी लातूर जिल्हयातील सर्व शासकीय व खाजगी शाळा तसेच महाविद्यालय, अंगणवाडी, व्यवसाय प्रशिक्षण केंद्रे येथे कार्यरत असलेले शिक्षक, प्राध्यापक, अंगणवाडी सेविका, आशा तसेच आरोग्य कर्मचारी यांनी आपआपल्या शैक्षणिक संकुल परिसरात / कार्यक्षेत्राच्या गावामध्ये उपस्थित राहून तेथील स्थानिक नागरिकांच्या घरोघरी जाऊन लहान-लहान समुहास (कमाल मर्यादा १० नागरीकास) करोना विषाणू संसर्गाच्या प्रतिबंधासाठी खालील प्रमाणे कार्यवाही करण्याचे आदेश देत आहे.

१) आरोग्य विभागाच्या अधिनस्त आरोग्य पर्यवेक्षक / आरोग्य सेवक / आशा इत्यादींच्या मार्फत घरोघरी जाऊन गृहस्थांच्या आरोग्याची तपासणी करावी.

२) तपासणीअंती ज्यांना सर्दी, खोकला, ताप असल्याचे आढळून आल्यास संबंधिताची प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या वैद्यकीय अधिकारी यांच्याकडे तपासणी करुन घ्यावी.

३) शालेय शिक्षकांनी घरोघरी जाऊन करोना विषाणूचा प्रतिबंधात्मक उपाय करण्यासाठी प्रबोधन व प्रात्याक्षिक करुन घ्यावेत. उदा. स्वच्छ हात धुण्याचे प्रात्याक्षिक, करोना विषाणू संसर्गाविषयी माहिती पत्रके (Pamphlet, Leaflet) वितरीत करणे व इतर अनुंषगीक प्रतिबंधात्मक उपाययोजनांची माहिती देणे.

४) नागरीकांनी गर्दीच्या ठिकाणी जाण्याचे टाळावे तसेच गर्दी होईल असा कोणताही सार्वजनिक स्वरुपाचा कार्यक्रम आयोजित करु नये अशा सूचना घरोघरी जाऊन द्याव्यात.

५) कुटूंबातील कोणत्याही व्यक्तीस सर्दी, खोकला, ताप तसेच श्वासोश्वास घेण्यास त्रास होत असल्यास तातडीने नजीकच्या रुग्णालयात आवश्यक ती तपासणी करुन घ्यावी. आजारी व्यक्तीच्या सहवासात असणा-या व्यक्तींनी विशेष काळजी घेण्याबाबत सूचना द्याव्यात.

६) प्रत्येक नागरीकांनी आपले हात प्रत्येक तासाला स्वच्छ धुवावेत तसेच प्रत्येकाने सोबत स्वच्छ हातरुमाल ठेवून त्याचा वापर करण्याबाबत प्रात्याक्षिक दाखवून सूचित करावे.

Phone: (02382-220204, 224001) Fax: (02382-222330)

Website: www.latur.nic.in, E-mail: laturcollector@gmail.com, rdclatur@gmail.com , ddmolatur@gmail.com

७) नागरीकांनी अनावश्यक प्रवास करणे टाळावे. त्याचबरोबर आपले कोणी नातेवाईक परदेशातून किंवा परराज्यातून परत आलेले असल्यास त्यांची तातडीने नजीकच्या रुग्णालयात तपासणी करून घेण्याबाबत सूचना द्याव्यात.

८) आपल्या घरचा व जवळचा परिसर स्वच्छ ठेवण्याबाबत सूचित करावे.

सदर उपक्रम प्रभावीपणे राबविण्यासाठी व यावर सनियंत्रण करण्यासाठी खालील प्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.

| अ.क्र. | अधिकारी | समिती मधील भुमिका |
|---|---|---|
| १ | तहसीलदार | अध्यक्ष |
| २ | गट विकास अधिकारी | सदस्य सचिव |
| ३ | स्थानिक पोलीस निरीक्षक | सदस्य |
| ४ | मुख्याधिकारी न.प./न.पं. | सदस्य |
| ५ | बालविकास प्रकल्प अधिकारी | सदस्य |
| ६ | तालुका आरोग्य अधिकारी | सदस्य |
| ७ | गट शिक्षणाधिकारी | सदस्य |

सदर समितीने उपरोक्त सूचनांप्रमाणे कार्यवाही होत असल्याबाबत खात्री करावी. तसेच याबाबत दररोज आढावा घेवून अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करावा. आदेशात दिलेल्या सूचनांचे पालन होत नसल्याचे निदर्शनास आल्यास संबंधितावर गुन्हे नोंद करावेत. सदरहू आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी.

**( जी. श्रीकांत )** भा.प्र.से.
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा**
**आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण लातूर**

**I] प्रतिलिपी माहितीस्तव सविनय सादर:-**

१. मा. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय मुंबई - ०३२
२. मा. संचालक, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, मंत्रालय मुंबई - ०३२
३. मा. विभागीय आयुक्त औरंगाबाद विभाग औरंगाबाद

**II] प्रत माहितीस्तव व आवश्यक कार्यवाहीस्तव**

१. मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. लातूर
२. आयुक्त, लातूर शहर महानगरपालिका, लातूर
३. सर्व उपविभागीय अधिकारी लातूर जिल्हा
४. सर्व तहसिलदार, लातूर जिल्हा

**III] प्रत अनुपालानास्तव:**

१. उपसंचालक, शिक्षण विभाग, लातूर
२. शिक्षणाधिकारी प्राथमिक / माध्यमिक जि.प. लातूर
३. प्राचार्य, अद्योगिक व्यवसाय प्रशिक्षण संस्था, लातूर
४. सर्व मुख्याधिकारी नगर पालिका / नगर पंचायत जिल्हा लातूर

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा**
**आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण लातूर**